“गोड मुलांनो - जेव्हा तुम्ही नंबरवार सतोप्रधान बनाल तेव्हा या नैसर्गिक आपत्ती आणि विनाशाचा जोर वाढेल आणि ही जुनी दुनिया संपुष्टात येईल”

प्रश्नः- कोणता पुरुषार्थ करणाऱ्यांना बाबांचा पूर्ण वारसा प्राप्त होतो?

उत्तरः- १) पूर्ण वारसा घ्यायचा असेल तर पहिले बाबांना आपला वारसदार बनवा अर्थात् जे काही तुमच्याकडे आहे, ते सर्व बाबांवर ओवाळून टाका. बाबांना आपला मुलगा बनवा तर पूर्ण वारशाचे अधिकारी बनाल. २) संपूर्ण पवित्र बनाल तेव्हाच पूर्ण वारसा मिळेल. संपूर्ण पवित्र बनला नाहीत तर सजा खाऊन थोडीशी मानी (पद) मिळेल.

ओम् शांती. मुलांना फक्त एकाच्याच आठवणीमध्ये बसायचे नाहीये. तिघांच्या आठवणीमध्ये बसायचे आहे. भले ते एकच आहेत परंतु तुम्ही जाणता ते पिता देखील आहेत, शिक्षक देखील आहेत, सद्गुरु सुद्धा आहेत. आम्हा सर्वांना परत घेऊन जाण्यासाठी आले आहेत, ही नवीन गोष्ट तुम्हीच समजता. मुले जाणतात ते जे भक्ती शिकवतात, शास्त्रे ऐकवतात, ते सर्व आहेत मनुष्य. यांना (शिवबाबांना) तर मनुष्य म्हणणार नाही ना. हे तर निराकार आहेत, निराकार आत्म्यांना बसून शिकवतात. आत्मा शरीराद्वारे ऐकते. हे ज्ञान बुद्धीमध्ये असले पाहिजे. आता तुम्ही बेहद बाबांच्या आठवणीमध्ये बसले आहात. बेहदच्या बाबांनी सांगितले आहे - ‘रुहानी मुलांनो, माझी आठवण कराल तर पापे नष्ट होतील’. इथे शास्त्र इत्यादीची कोणती गोष्ट नाही. तुम्ही जाणता की, बाबा आम्हाला राजयोग शिकवत आहेत. किती जबरदस्त टीचर आहेत, उच्च ते उच्च, तर पद देखील उच्च ते उच्च प्राप्त करून देतात. जेव्हा तुम्ही नंबरवार पुरुषार्था नुसार सतोप्रधान बनाल तेव्हा मग युद्ध होईल. नैसर्गिक आपत्ती देखील येतील. आठवण देखील जरूर करायची आहे. बुद्धीमध्ये सर्व ज्ञानसुद्धा असले पाहिजे. फक्त एकदाच पुरुषोत्तम संगमयुगावर बाबा येऊन नव्या दुनियेसाठी समजावून सांगतात. छोटी मुले देखील आपल्या पित्याची आठवण करतात. तुम्ही तर समजूतदार आहात, जाणता की बाबांची आठवण केल्याने विकर्म विनाश होतील आणि बाबांकडून श्रेष्ठ पद प्राप्त होईल. हे देखील जाणता या लक्ष्मी-नारायणाने नव्या दुनियेमध्ये जे पद प्राप्त केले आहे ते शिवबाबांकडूनच प्राप्त केले आहे. हे लक्ष्मी-नारायणच मग ८४ चे चक्र फिरून आता ब्रह्मा-सरस्वती बनले आहेत. पुन्हा हेच लक्ष्मी-नारायण बनतील. आता पुरुषार्थ करत आहेत. सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान तुम्हाला आहे. आता तुम्ही अंधश्रद्धेने देवतांसमोर डोके टेकणार नाही. मनुष्य देवतांसमोर जाऊन आपल्याला पतित सिद्ध करतात. म्हणतात - ‘तुम्ही सर्वगुणसंपन्न आहात, आम्ही पापी, विकारी आहोत, आमच्यामध्ये कोणतेही गुण नाही आहेत’. तुम्ही ज्यांची महिमा गात होता, आता तुम्ही स्वतः ते बनत आहात. म्हणतात - ‘बाबा, ही शास्त्रे इत्यादी वाचणे केव्हापासून सुरू झाले आहे?’ बाबा म्हणतात - ‘जेव्हापासून रावणराज्य सुरू झाले आहे’. ही सर्व आहे भक्तीची सामुग्री. तुम्ही जर इथे बसता तर बुद्धीमध्ये सर्व ज्ञान धारण झाले पाहिजे. आत्मा हे संस्कार घेऊन जाईल, भक्तीचे संस्कार जाणार नाहीत. भक्तीचे संस्कार असणारे जुन्या दुनियेमध्ये मनुष्यांकडेच जन्म घेतील, हे देखील निश्चित आहे. तुमच्या बुद्धीमध्ये हे ज्ञानाचे चक्र फिरत राहिले पाहिजे. त्याचसोबत बाबांची देखील आठवण करायची आहे. बाबा आपले पिता देखील आहेत. बाबांची आठवण कराल तर विकर्म विनाश होतील. बाबा आमचे टीचर देखील आहेत तर अभ्यास बुद्धीमध्ये येईल आणि सृष्टीचक्राचे ज्ञान बुद्धीमध्ये आहे, ज्याद्वारे तुम्ही चक्रवर्ती राजा बनाल. (आठवणीची यात्रा चालू आहे)

ओम् शांती. भक्ती आणि ज्ञान. बाबांना म्हटले जाते ज्ञानाचा सागर. त्यांना भक्तीबद्दल सर्व माहिती आहे - भक्ती केव्हा सुरू झाली, केव्हा पूर्ण होईल. मनुष्यांना हे ठाऊक नाही. बाबाच येऊन समजावून सांगतात. सतयुगामध्ये तुम्ही देवी-देवता विश्वाचे मालक होता. तिथे भक्तीचे नावसुद्धा नाही. एकही मंदिर नव्हते. सर्व देवी-देवताच होते. नंतर जेव्हा दुनिया अर्धी जुनी होते म्हणजे २५०० वर्षे पूर्ण होतात अथवा त्रेता-द्वापरचा संगम असतो तेव्हा रावण येतो. संगम तर जरूर पाहिजे. त्रेता आणि द्वापरच्या संगमावर रावण येतो जेव्हा देवी-देवता वाममार्गामध्ये जातात. हे तुमच्याशिवाय इतर कोणीही जाणत नाही. बाबा देखील येतात कलियुगाचा अंत आणि

सतयुग आदिच्या संगमावर आणि रावण येतो त्रेता आणि द्वापरच्या संगमावर. आता त्या संगमाला कल्याणकारी म्हणणार नाही. त्याला तर अकल्याणकारीच म्हणणार. बाबांचेच नाव 'कल्याणकारी' आहे. द्वापर पासून अकल्याणकारी युग सुरू होते. बाबा तर आहेत चैतन्य बीजरूप. त्यांना पूर्ण झाडाचे ज्ञान आहे. ते (स्थूल) बीज सुद्धा जर चैतन्य असेल तर त्याने समजावून सांगावे की, माझ्यातून हे झाड असे उगवते. परंतु जड (निर्जीव) असल्यामुळे सांगू शकत नाही. आपण समजू शकतो की बी पेरल्यानंतर आधी छोटेसे झाड उगवते. मग मोठे होऊन फळ द्यायला सुरुवात करते. परंतु चैतन्य बीजच सर्वकाही सांगू शकते. आजकाल दुनियेमध्ये मनुष्य काय-काय करत राहतात. शोध लावत राहतात. चंद्रावर जाण्याचा प्रयत्न करतात. या सर्व गोष्टी आता तुम्ही ऐकत आहात. चंद्राच्या दिशेने किती उंचावर लाखो मैलांपर्यंत जातात, शोध घेण्याकरीता की पहावे तरी, चंद्र काय चीज आहे? समुद्रामध्ये किती दूरपर्यंत जातात, शोध घेतात, परंतु शेवट काही सापडू शकत नाही, पाणीच पाणी आहे. विमानातून वर जातात, त्यांना इंधन इतके भरावे लागते की पुन्हा परत सुद्धा येऊ शकतील. आकाश बेहद (अथांग) आहे ना, समुद्र देखील बेहद आहे. जसे हे (शिवबाबा) बेहदचे ज्ञानसागर आहेत, तो आहे पाण्याचा बेहदचा सागर. आकाश तत्त्व देखील बेहद आहे. जमीन देखील बेहद आहे, चालत रहा. समुद्राच्या खाली सुद्धा जमीन आहे. पर्वत कशावर उभे आहेत? जमिनीवर. मग जमीन खोदतात तर डोंगर निघतो, त्याच्या खाली पुन्हा पाणीसुद्धा निघते. समुद्र सुद्धा जमिनीवर आहे. त्याचा अंत कोणाला सापडू शकत नाही की कुठपर्यंत पाणी आहे, कुठपर्यंत जमीन आहे? परमपिता परमात्मा जे बेहदचे बाबा आहेत, त्यांना बेअंत म्हणणार नाही. मनुष्य भले म्हणतात ईश्वर बेअंत आहे, माया देखील बेअंत आहे. परंतु तुम्ही जाणता की ईश्वर तर बेअंत असूच शकत नाही. बाकी हे आकाश बेअंत आहे. ही ५ तत्त्व आहेत; आकाश, वायू... ही ५ तत्त्व तमोप्रधान बनतात. आत्मा देखील तमोप्रधान बनते मग बाबा येऊन सतोप्रधान बनवतात. किती छोटी आत्मा आहे, ८४ जन्म भोगते. हे चक्र फिरतच राहते. हे अनादि नाटक आहे, याचा शेवट होत नाही. हे परंपरेने चालत येते. केव्हापासून सुरू झाले - हे सांगितले तर मग अंत देखील हवा. बाकी ही गोष्ट समजावून सांगायची आहे की, 'नवीन दुनिया केव्हापासून सुरू होते. पुन्हा जुनी होते. हे ५ हजार वर्षांचे चक्र आहे जे फिरतच राहते'. हे आता तुम्ही जाणता, बाकी त्यांनी तर थापा मारल्या आहेत. शास्त्रांमध्ये लिहिले आहे की सतयुगाचे आयुर्मान इतक्या लाख वर्षांचे आहे. तर मनुष्य ऐकून-ऐकून तेच सत्य समजतात. ते हेच समजत नाहीत की भगवान केव्हा येऊन आपला परिचय देतील? जोपर्यंत तुम्ही समजावून सांगत नाही तोपर्यंत माहीत नसल्यामुळे म्हणतात कलियुगाची अजून ४० हजार वर्षे बाकी आहेत. आता तुम्ही निमित्त आहात हे समजावून सांगण्यासाठी की, कल्प ५ हजार वर्षांचे आहे, लाखो वर्षांचे नाही.

भक्तिमार्गाची किती सामुग्री आहे, मनुष्यांकडे पैसा असतो तर मग खर्च करतात. बाबा म्हणतात - मी तुम्हाला किती संपत्ती देऊन जातो! बेहदचे बाबा तर जरूर बेहदचा वारसा देतील. यामुळे सुख सुद्धा मिळते, आयुष्य देखील वाढते. बाबा मुलांना म्हणतात - 'माझ्या लाडक्या मुलांनो, आयुष्मान भव'. तिथे तुमचे आयुष्य १५० वर्षे असते, काळ कधीही खाऊ शकत नाही. बाबा वर देतात, तुम्हाला दीर्घायुषी बनवतात. तुम्ही अमर बनता. तिथे कधी अकाली मृत्यू होणार नाही. तिथे तुम्ही खूप सुखी असता म्हणून म्हटले जाते सुखधाम. आयुर्मान देखील जास्त असते, संपत्ती देखील भरपूर मिळते, खूप सुखी सुद्धा असता. गरीबापासून सिरताज (मुकुटधारी) बनता. तुमच्या बुद्धीमध्ये आहे - बाबा येतात देवी-देवता धर्माची स्थापना करण्यासाठी. ते तर जरूर छोटेच झाड असेल. तिथे आहेच एक धर्म, एक राज्य, एक भाषा. त्यालाच म्हटले जाते विश्वामध्ये शांती. साऱ्या विश्वामध्ये आम्हीच पार्टधारी आहोत. हे दुनिया जाणत नाही. जर जाणत असेल तर सांगावे आम्ही केव्हापासून पार्ट बजावत आलो आहोत? आता तुम्हा मुलांना बाबा समजावून सांगत आहेत. गाण्यामध्ये देखील आहे ना - बाबांकडून जे मिळते ते इतर कोणाकडूनही मिळत नाही. सारी पृथ्वी, आकाश, साऱ्या विश्वाचे राज्य देतात. हे लक्ष्मी-नारायण विश्वाचे मालक होते आणि नंतर जे राजे इत्यादी झाले ते फक्त भारताचे होते. गायन देखील आहे जे बाबा देतात, ते इतर कोणीही देऊ शकत नाही. बाबाच येऊन प्राप्ती करून देतात. तर हे सर्व ज्ञान बुध्दीमध्ये राहिले पाहिजे जेणेकरून कोणालाही समजावून सांगू शकाल. इतके समजून घ्यायचे आहे. आता कोण समजावून सांगू शकतात? ज्यामुळे बंधनमुक्त होतील. बाबांकडे जेव्हा कोणी येतात तर बाबा विचारतात - 'किती मुले आहेत?' तर म्हणतात - ५ मुले माझी आहेत आणि सहावा मुलगा शिवबाबा आहे; तर नक्कीच सर्वात मोठा मुलगा झाला ना. शिवबाबांचे बनलात तर मग शिवबाबा आपला मुलगा बनवून विश्वाचा मालक बनवतात. मुले वारसदार होतात. हे लक्ष्मी-नारायण शिवबाबांचे पूर्ण वारसदार आहेत कारण आधीच्या जन्मामध्ये शिवबाबांना सर्वकाही दिले आहे. तर वारसा जरूर मुलांना मिळाला पाहिजे. शिवबाबा म्हणाले - 'मला वारस बनव मग दुसरे कोणीही नाही'. ब्रह्मा बाबा म्हणतात -

‘बाबा, हे सर्व काही तुमचे आहे, तुमचे मग आमचे आहे. तुम्ही मला साऱ्या विश्वाच्या बादशाहीचा वारसा देता कारण जे काही होते ते तुम्हाला देऊन टाकले’. ड्रामामध्ये तसे नोंदलेलेच आहे ना. अर्जुनाला विनाश सुद्धा दाखवला तर चतुर्भुज (विष्णू) देखील दाखवला. अर्जुन कोणी दुसरा तर नाहीये, यांना (ब्रह्मा बाबांना) साक्षात्कार झाला. बघितले, राज्य मिळते आहे तर का नाही शिवबाबाला वारसदार बनवायचे. ते मग मला वारसदार बनवतात. हा सौदा तर खूप चांगला आहे. कधी कोणाला काही विचारले नाही. गुप्तपणे सर्व काही दिले. ज्याला म्हटले जाते गुप्त दान. कोणाला काहीच समजले नाही की, यांना काय झाले. कोणी समजले यांना वैराग्य आले, बहुतेक संन्यासी बनला. तर या मुली देखील म्हणतात - ५ मुले तर आमची आहेत, बाकी एक मुलगा आम्ही यांना बनवू. या सर्वांनी देखील सर्व काही बाबांपुढे ठेवले, ज्याद्वारे खूप जणांची सेवा होईल. बाबांना पाहून सर्वांना विचार आला, सर्व घरदार सोडून पळून आले. तिथूनच गदारोळ सुरू झाला. घरदार सोडण्याची त्यांनी हिम्मत दाखवली. शास्त्रांमध्ये देखील लिहिले आहे - भट्टी बनली होती कारण त्यांना निश्चितच एकांत पाहिजे. बाबांव्यतिरिक्त इतर कोणाचीही आठवण राहू नये. मित्र-नातेवाईक इत्यादींची देखील आठवण राहू नये कारण आत्मा जी पतित बनली आहे तिला पावन जरूर बनवायचे आहे. बाबा म्हणतात - ‘घर-गृहस्थीमध्ये राहून पवित्र बना’. इथेच अडचण येते. म्हणत होते - हे पती-पत्नीमध्ये वाद उत्पन्न करणारे ज्ञान आहे; कारण एक पवित्र बनणार, दुसरा बनणार नाही त्यामुळे भांडणे सुरु होतात. या सर्वांनी मार खाल्ला आहे कारण अचानक नवीन गोष्ट झाली ना. सर्व आश्चर्य करू लागले, हे काय झाले ज्यामुळे इतके सर्व पळत आहेत. मनुष्यांमध्ये समज तर नाहीये. एवढे मात्र म्हणत होते - ‘कोणती शक्ती आहे!’ असे तर कधी झाले नाही ज्यामुळे आपले घरदार सोडून पळावे. ड्रामामध्ये ही सर्व चरित्रे शिवबाबांची आहेत. कोणी रिकाम्या हाताने पळाले, हा देखील एक खेळ आहे. घरदार वगैरे सर्व सोडून पळाले, काहीच आठवले नाही. बाकी फक्त हे शरीर आहे, ज्याच्याद्वारे काम करायचे आहे. आत्म्याला देखील आठवणीच्या यात्रेने पवित्र बनवायचे आहे, तेव्हाच पवित्र आत्मे परत जाऊ शकतील. स्वर्गामध्ये अपवित्र आत्मा तर जाऊ शकत नाही. तो नियम नाही. मुक्तीधाम मध्ये पवित्रच पाहिजेत. पवित्र बनण्यामध्येच किती विघ्ने येतात. या आधी कुठे सत्संग इत्यादीमध्ये जाण्यासाठी आडकाठी थोडीच होत होती? कुठेही जात होते. इथे पवित्रतेच्या कारणामुळे विघ्ने येतात. हे तर समजतात - पवित्र बनल्याशिवाय परत घरी जाऊ शकत नाही. धर्मराजाकडून शिक्षा भोगावी लागेल. मग शेवटी थोडासा मान (पद) मिळेल. शिक्षा भोगावी लागली नाही तर पद देखील चांगले मिळेल. ही समजून घेण्याची गोष्ट आहे. बाबा म्हणतात - ‘गोड मुलांनो, तुम्हाला माझ्याजवळ यायचे आहे. हे जुने शरीर सोडून पवित्र आत्मा बनून यायचे आहे. मग जेव्हा ५ तत्त्व सतोप्रधान नवी होतील तेव्हा तुम्हाला नवीन सतोप्रधान शरीरे मिळतील. उलथा-पालथ होऊन सगळे नवीन बनतील’. जसे बाबा यांच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) येऊन बसतात, तशी आत्मा काहीही त्रास न होता गर्भ-महालात जाऊन बसेल. मग जेव्हा वेळ होईल तेव्हा बाहेर येते; तर त्यावेळी जणू वीज चमकते कारण आत्मा पवित्र आहे. हे सर्व ड्रामामध्ये नोंदलेले आहे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आत्म्याला पावन बनविण्याकरीता एकांताच्या भट्टीमध्ये रहायचे आहे. एका बाबांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही मित्र-नातेवाईकाची आठवण येता कामा नये.
2. २) बुद्धीमध्ये सर्व ज्ञान ठेवून, बंधनमुक्त बनून दुसऱ्यांची सेवा करायची आहे. बाबांसोबत खरा सौदा करायचा आहे. जसे बाबांनी (ब्रह्मा बाबांनी) सर्व काही गुप्त केले, तसे गुप्त दान करायचे आहे.

वरदान:- मायेचे विक्राळ रूपातील खेळ साक्षी होऊन बघणारे मायाजीत भव

मायेला वेलकम करणारे तिच्या विक्राळ रूपाला पाहून घाबरत नाहीत. साक्षी होऊन खेळ पाहिल्याने मजा येते कारण मायेचे बाह्यरूप वाघाचे आहे, परंतु तिच्यामध्ये मांजरी एवढी सुद्धा ताकद नाहीये. फक्त तुम्ही तिला घाबरून मोठे बनवता - ‘काय करू, कसे होईल…’. परंतु हाच धडा लक्षात ठेवा - जे होत आहे ते चांगले आणि जे होणार आहे ते अजूनच चांगले. साक्षी होऊन खेळ बघा तर मायाजीत बनाल.

बोधवाक्य:- जे सहनशील असतात त्यांना कोणाच्याही भाव-स्वभावाचा मत्सर वाटत नाही, ते व्यर्थ गोष्टींना

एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देतात.

||| ओम शांती |||